**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७९/२०२०** **दिनांक ०१/१०/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २५/०९/२०२० ते ०१/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०२/१०/२०२० सकाळी ८:३० पासून ०६/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२५/०९** | **२६/०९** | **२७/०९** | **२८/०९** | **२९/०९** | **३०/०९** | **०१/१०** | | **०२/१०** | **०३/१०** | **०४/१०** | **०५/१०** | **०६/१०** |
| ३.० | ४.० | ०.० | १८.० | ०.० | - | - | **पाऊस (मिमी)** | १३ | १८ | २० | १८ | ९ |
| ३२.० | ३२.६ | ३४.२ | ३३.८ | ३३.० | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३४ |
| २४.२ | - | २४.० | २४.० | २५.० | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २५ | २६ |
| ४ | ४ | ३ | ५ | ४ | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ |
| ९४ | - | ८९ | ९८ | ९० | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९० | ९० | ९१ | ९३ | ९३ |
| ८० | ८२ | ७४ | ८३ | ७८ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६९ | ६८ | ६८ | ७२ | ७१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ४ | ८ | ५ | ५ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | नै. | प. | नै.द. | द. |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यातील काही ठिकाणी दिनांक २ ते ५ ऑक्टोबर, २०२० दरम्यान मध्यम स्वरूपाच्या आणि दिनांक ६ ऑक्टोबर, २०२० रोजी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश अंशत: ढगाळ राहील. |
| **इशारा** | दिनांक ३ आणि ४ ऑक्टोबर, २०२० रोजी ठाणे जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ९ ते १५ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीइतक्या पाऊसाची शक्यता आहे. |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **फुलोरा ते दाणे अवस्था (गरव्या जाती), दाणे भरणे अवस्था (निमगरव्या जाती) आणि पक्वता अवस्था (हळव्या जाती)** | • हवामान अंदाजानुसार दिनांक २ ते ६ ऑक्टोबर, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या हळवे भाताची कापणी सकाळच्या वेळेस “वैभव” विळ्याने जमिनीलगत करावी. कापणी केलेल्या भाताची लगेच मळणी करून धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• पिकाची कापणी जमिनीलगत करावी तसेच कापणीनंतर शेताची नांगरट करून धस्कटे काढून नष्ट करावीत. यामुळे पुढील हंगामात खोड किड आणि निळे भुंगेरे याचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.<br>• गरवे भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत आणि निम गरवे भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. नियंत्रित करावी.<br>• गरवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असताना नत्र खताची तिसरी मात्रा २८ किलो युरिया प्रती एकरी देण्यात यावी.<br>• पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने माळजमिनीवर असलेल्या हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची त्वरित कापणी करावी. तसेच भात कापणी नंतर जमिनीची खोल नांगरणी करावी त्यामुळे किडीचे सुप्तावस्थेतील कोष नष्ट होण्यास मदत होईल.<br>• सकाळच्या वेळेस जास्त आर्द्रता असण्याची शक्यता असल्याने दुधाळ अवस्थेत असलेल्या निमगरव्या आणि गरव्या भात पिकावर लोंबीवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. भात पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रौढ ढेकण्या व त्याची लहान पिल्ले दाण्याला छिद्र पाडून आतील रस शोषून घेतात. त्यामुळे दाणे पोचट राहतात आणि लोंब्या अर्धवट भरतात. अशा दाण्यावर एक सूक्ष्म छिद्र दिसून येते व छिद्राभोवती काळपट, तपकिरी ठिपका तयार होतो. किडीच्या नियंत्रणासाठी बांधावरील गवत कापून बांध स्वच्छ ठेवावेत. पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रति चूड एक ढेकण्या आढळून आल्यास नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.). |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवण्याची शक्यता असल्याने आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने नवीन पालवीचे तुडतुडे आणि मिज माशीच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंबा बागेतील गवत, रोगग्रस्त फांद्या काढून बागेची साफसफाई करावी आणि नंतर कीटकनाशकाची फवारणी घ्यावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची वाढत्या उन्हामुळे पाने करपू नये म्हणून |

| | | |
|---|---|---|
| | | पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकू बागांची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी तसेच १ टक्के बोर्डोमिश्रणाची संपूर्ण झाडावर फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता जमीन वाफसा स्थितीत असताना मशागत करावी. वाफे तयार करण्याअगोदर जमिनीत चांगले कुजलेले शेणखत ५०० किलो प्रति गुंठा मिसळावे. ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावे. पेरणीच्या वेळेस गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून १० सें.मी. अंतरावर ओळीने भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणी करण्या अगोदर बियाण्या द्वारे पसरणाऱ्या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास थायरम ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे किंवा ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करतेवेळी किंचित पाणी लावून जैविक बुरशीनाशकाचे पातळ आवरण बियाण्याभोवती होईल असे पहावे. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**